**विशेष दिवाणी दावा क्रमांक ११६/२०१६ मधील निशाणी ९७ वरील आदेश**
**(निलेश गांधी वि. मे. अरिहंत डेव्हलपर्स)**
**CNR NO.MHSNO20007562016**

प्रतिवादी यांनी, त्यांच्या विरुध्द 'उलटतपास नाही' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन मागण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी मुळ दावा रक्कम वसुलीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी विनाकैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल केलेली आहे. परंतु वादी यांनी नव्याने सरतपास न देता पुर्वी दाखल केलेला सरतपास हाच कायम केला आहे. परंतु पुर्वीच्या सरतपासाच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द ‘उलटतपास नाही’ असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेणेचा असल्याने सदरचा ‘उलटतपास नाही’ आदेश रद्द करुन त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदर अर्जास अनुषंगिक वादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

०४. उभय पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांना अनुसरुन पुढील विवाद मुद्दा माझ्या समोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी यांच्याविरुध्द 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश, रद्द करुन होणेस पात्र ठरतो का ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०५. सदर अर्जास अनुसरुन दाव्याचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा रक्कम वसुल होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. यापुर्वी प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली नसल्यामुळे दाव्याचे कामकाज विनाकैफियत चालु झालेले होते. त्यामुळे वादी यांनी जे साक्षीदार दिलेले होते त्यांचादेखील उलटतपास प्रतिवादी यांना घेता आलेला नव्हता. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करुन मागितला. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत केसकामी समाविष्ट करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना वादींचा उलटतपास घेण्याचीदेखील संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपावरुन दावा हा रक्कम वसुलीचा असल्यामुळे व सदरचा दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने प्रस्तुत प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेण्याची परवानगी नाकारल्यास, त्यांना त्यांचा बचाव घेण्याची संधी नाकारल्या सारखे होईल. तसेच सदर दावा गुणदोषावर निकाली होणार नाही. त्यामुळे भविष्यातील दावे–प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी व साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची परवानगी देणे उचित ठरते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' असा पारीत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येतो व नि.९७ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.07.20 11:41:29 +0530

सांगली. **(अ. अ. मेहेंदळे)**

दिनांक १९.०७.२०२३ २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.

प्र मा ण प त्र

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | १९/०७/२०२३. |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | २०/०७/२०२३. |